नमुना प्रश्नपत्रिका

# मराठी (वाचनपाठ)

इ. १०वी

एकूण गुण ८०

---

**प्र.१ अ) योग्य पर्याय शोधून पुढील विधाने पूर्ण करा.** ०४

१) खादी व स्वदेशी हे ______________

(जीवनकार्य होते/जीवनगान होते/जीवनव्रत होते/जीवनध्येय होते)

२) महाराष्ट्राबाहेरही मास्तरांची ______________

(कामे सुरू झाली/भ्रमंती सुरू झाली/फिरती सुरू झाली/भटकंती सुरू झाली)

३) पोरांचे हे विचार ऐकून नागीण ______________

(थक्क झाली/स्तब्ध झाली/दु:खी झाली/आश्चर्यचकित झाली)

४) वीणेची तार छेडल्यावर काही वेळानं तिचा ______________ .

(नाद विरून जातो/नाद ऐकू येतो/स्वर ऐकू येतो/स्वर बिघडतो)

**आ) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** ०३

१) खरं तर निसर्गापेक्षा मोठा ______________ जगात कोठेही नाही.

(न्यायाधिश/सेवक/डॉक्टर/शिक्षक)

२) ______________ हे उत्पादक शारीरिक परिश्रमाचे प्रतीक मानले जाई.

(कंदील/पुस्तक/सूतकताई/कॅक्टस)

३) बिहारच्या सामाजिक जीवनावर लिहिलेले ______________ हे अनिल अवचट यांचे पहिले पुस्तक होय.

(पूर्णिया/आप्त/माणसं/मोर)

**इ) पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** ०३

१) कोणती नदी रारंग ढांगला वळसा घालून वाहते ?

२) नारायण सुर्वे यांच्या कोणत्या काव्यसंग्रहाला अकरा पुरस्कार मिळाले ?

३) झाडं आनंदाविभोर कशामुळे होतात ?

**प्र.२ अ) पुढीलपैकी कोणत्याही एका विधानाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** ०३

१) 'माझ्याशी मैत्री म्हणजे खूप खूप पुस्तकं वाचायची'.

२) 'हे उत्सव आवाज किंवा गर्दी या दोन्ही मुद्द्यांवर उपद्रवकारक ठरता कामा नयेत.'

**आ) पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०९

१) बाबा आमटे यांनी आनंदवनाची निर्मिती कशी केली ?

२) बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोणते कष्ट घेतले ?

३) ईद सणादिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे ?

४) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?

५) स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे ?

**प्र.३ अ) पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** ०३

१) हिरवेगार पीक कोठे नाचत आहे ?

२) संत सेना महाराज यांचा सर्व थकवा कशामुळे गेला ?

३) विश्वकर्मा कशाचा पुजारी आहे ?

**आ) पुढील पद्यपंक्तींतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** ०३

१) चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख ____________

(नमस्कार/प्रणाम/मुजरे/वरदान)

२) अभ्रीची ____________ काय साच खरी !

(माया/दया/काया/छाया)

३) खुले हंसणे दिसेल माझ्या ____________ ओठी.

(चिमण्यांच्या/मुलांच्या/कुटुंबाच्या/मित्राच्या)

**प्र.४ अ) पुढीलपैकी कोणत्याही एका पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** ०३

१) वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी

२) करी भक्तांचा सांभाळु । अनाथांचा तूं कृपाळू ।
आम्ही बहुत अन्यायी । क्षमा करी विठाबाई ।।

**आ) पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०९

१) कवी माडगूळकर यांच्या मते परमेश्वराचे दर्शन कोठे कोठे घडते ?

२) कवीला आपल्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?

३) प्रलय होईल तेव्हा कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे ?

४) कवीच्या मते दुःख गिळून स्त्री काय करते ? हे 'आपण धरणी गं' या कवितेच्या आधारे लिहा.

५) 'एकत्वाचे गीत महान' या कवितेत आपल्या देशातील वेगळेपण कवयित्रीने कसे वर्णन केले आहे ?

**प्र.५ पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ७० शब्दांत लिहा.** ०८

१) जुईचे आईबाबा घरी कोणकोणती कामे करायचे ?

२) स्वातंत्र्य चळवळीत प्रतिसरकारने कोणकोणती विधायक कामे केली ?

३) कोल्हापुरी गुळाचे वर्णन आनंद यादव यांनी कसे केले आहे ?

४) या जगात वावरताना आपल्या नातवंडांनी काय केले पाहिजे असे मृणालिनी साराभाई सांगतात ?

***किंवा***

**पुढीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१) प्रतिसरकार

२) गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व

**प्र.६ अ) पुढील वाक्यांपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** ०२

१) ते सारे स्वताच्या शेतीवर मुक्तपणे जिवन जगतात.

२) शास्वत शिक्षणसंपत्ती कधी क्षिण होत नाही.

**आ) पुढील सामासिक शब्दांपैकी कोणत्याही दोन शब्दांचा समास ओळखा.** ०२

पानसुपारी, षटकोन, धर्माधर्म, बंधुभगिनी

**इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून कोणतीही दोन वाक्ये लिहा.** ०२

१) या मुंग्यांना आपण वारुळाची रचना बदलायला सांगू. (प्रश्नार्थक करा)

२) फार मोठा अवघड प्रश्न आहे. (उद्‌गारवाचक करा.)

३) तुला काही कळतंय का त्यातलं ? (विधानार्थी करा)

**ई) पुढील कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा त्याखाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतीही चार)** ०४

(थक्क होणे, मूठमाती देणे, घामाघूम होणे, हैराण करणे, सार्थक होणे, विपर्यास करणे)

१) बराच वेळ क्रिकेट खेळल्यावर मुले थकून गेली.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अंधश्रद्धा नष्ट केल्या.

३) मी मीनाला खूप समजावले पण तिने माझ्या सांगण्याचा चुकीचा अर्थ घेतला.

४) प्रवीणला चांगली नोकरी मिळाली तेव्हा आपण जीवनात यशस्वी झालो, असे त्याला वाटले.

५) ताजमहालचे सौंदर्य पाहून आम्हांला आश्‍चर्य वाटले.

६) काही मुले कारण नसताना मुक्या प्राण्यांना त्रास देतात.

**प्र.७ अ) पुढील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** ०४

(प्रत्येक प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात यावे असे प्रश्न तयार करावेत.)

'हिंद स्वराज्य' या पुस्तकात गांधीजींच्या विचारांचे आणि अनुभवांचे सार आहे. फक्त ऐहिक संपत्तीचा साठा करीत बसणाऱ्या आधुनिक संस्कृतीचा आणि पाश्‍चात्य संस्कृतीचा त्यांनी निषेध केला. सदाचारावर त्यांचा भर होता. सुख हे साधेपणात आहे. शारीरिक श्रमांना महत्त्व आहे असे त्यांनी

सांगितले. शहरी यांत्रिक जीवनापेक्षा श्रमावर आधारित ग्रामीण पद्धतीचा त्यांनी पुरस्कार केला. अशा साध्या जीवनातच खरी शांती आणि सौख्य अधिक आहे अशी त्यांची श्रद्धा होती. सत्य हे शस्त्र मानून दुष्टपणा, अडाणीपणा आणि हिंसा या प्रवृत्तींशी लढा दिला पाहिजे. सत्याग्रहाने शत्रूंची मने जिंकली पाहिजेत आणि जनतेची अंत:करणे प्रेमाच्या भावनेने बांधली पाहिजेत. असे अनेक सुंदर विचार त्यांनी या पुस्तकात मांडले आहेत. हे पुस्तक म्हणजे स्वातंत्र्यसैनिकांची गीताच होती.

**आ) पुढील मुद्द्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** ०४

एक भिकारी -- रस्त्यावर बसून भीक मागणे -- रस्त्याने राजाची मिरवणूक -- भिकाऱ्याला लोभ -- राजाकडून खूप काही मिळेल -- राजानेच भिकाऱ्यापुढे हात पसरणे -- झोळीतील धान्याचा एक दाणा देणे -- घरी परतणे -- झोळीतील धान्यात सोन्याचा एक दाणा -- पश्चाताप.

इ) प्रवीण/प्राजक्ती पाठक भारतमाता विद्यालय, लातूर हा/ही सहल विभाग प्रतिनिधी या नात्याने आगार प्रमुख, लातूर (एस.टी.) यांना पत्र लिहून नाशिक-शिर्डी या क्षेत्रांना भेट देण्यासाठी बसची व्यवस्था करण्याविषयी चौकशी करीत आहे. पत्राचा नमुना तयार करा. ०४

***किंवा***

'वृद्धाश्रमात साजरा केलेला स्वातंत्र्यदिन' या विषयावर वृत्तान्त लिहा.

***किंवा***

'योगासन शिबिराची जाहिरात तयार करा.'

**प्र.८ पुढील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** १०

१) माझा महान भारत

भारत देश -- इतर देशांपेक्षा असणारे वेगळेपण -- विविध राज्ये व भाषा -- सण व उत्सव -- नद्या, पिके -- विविधता -- विविधतेत एकता -- सर्वधर्मसमभाव -- राष्ट्रीय एकात्मता -- देशाचा अभिमान वाटणे.

२) पाऊस पडला नाही तर ---

नेमाने येणारा पाऊस -- सर्वांची तारांबळ -- चिखल व दलदल -- नद्यांना महापूर -- दैनंदिन जीवनात व्यत्यय -- नको तो पाऊस -- पिके नाहीत -- अन्नधान्य न मिळणे -- सर्वत्र दुष्काळ -- पाऊस हवाच.

३) शेतकऱ्याचे मनोगत

मी एक शेतकरी -- नाव, गाव -- बालपण -- कष्टाचे जीवन -- शेतीवर जीवन अवलंबून -- लहरी निसर्ग -- कमी उत्पादन -- काही सुधारणा -- परिस्थितीत बदल -- सरकारी निर्णय -- मदत मिळणे -- समाधाने वृत्ती -- काही अपेक्षा.

***